आयडियल पूर्ण प्राथमिक शाळा
५११, शनिवार पेठ, पुणे - ३०

माध्यमिक शिक्षण विभाग
जा.क्र.जिप/शिक्षण/माध्य/शा/स्व.मा.प्र/२०१६
पुणे दिनांक ३०/०४/२०१६.

प्रति.

शिक्षण प्रमुख, शिक्षण मंडळ, पुणे म.न.पा.शिवाजीनगर पुणे
प्रशासन अधिकारी, शिक्षण मंडळ, पिंपरी चिंचवड म.न.पा.पिंपरी पुणे.
गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती (सर्व) जि.पुणे.
मुख्याध्यापक पुणे जिल्हयातील सर्व माध्यमिक शाळा

<u>विषय</u>- बालकांच्या मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ, बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम, २०११ याचा नियम ११, पोट नियम (४) अन्वये शाळांना स्वमान्यता प्रमाणपत्र देणेबाबत.
**(जिल्हयातील फक्त सर्व माध्यमिक शाळा- इ.५ ते १० / इ.८ ते १० / ५ ते १२ साठी )**

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, पुणे जिल्हयातील सर्व खाजगी अनुदानित , विना अनुदानित, अंशत अनुदानित, कायम विनाअनुदानित व स्वयंअर्थसहाय्यित शाळांना शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी दि.१/४/२०१३ ते दि.३१/३/२०१६ या कालावधीसाठी स्वमान्यता प्रमाणपत्र दिलेले आहे. त्याची मुदत दि.३१/३/२०१६ रोजी संपलेली आहे. बालकांच्या मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ अन्वये **<u>पुन्हा दि.१/४/२०१६ ते दि.३१/३/२०१९ अखेर स्वमान्यता प्रमाणपत्र नुतनीकरणाने सर्व शाळांनी घेणे अनिवार्य आहे.</u>** त्यासाठी आपण आपल्या कार्यक्षेत्रातील माध्यमिक शाळांच्या फाईल्स ( इ.५ ते १० वी / इ.८ वी ते १० वी /८ वी ते १२ वी पर्यंतचे वर्ग सुरु असलेल्या माध्यमिक शाळा) एकत्रित करुन सोबत जोडलेल्या तपासणी फार्ममध्ये स्वमान्यतेबाबत शिफारस करुन या कार्यालयाकडे विनाविलंब सादर कराव्यात.

१) पुणे महानगर पालिका कार्यक्षेत्रातील माध्यमिक शाळांसाठी सहा.प्रशासकीय अधिकारी, शिक्षण मंडळ पुणे म.न.पा. पुणे यांचे कार्यालयात सदरचे प्रस्ताव सादर करावेत.
२) पिंपरी चिंचवड पालिका कार्यक्षेत्रातील माध्यमिक शाळांसाठी प्रशासन अधिकारी, शिक्षण मंडळ पिंपरी चिंचवड म.न.पा.पिंपरी पुणे यांचे कार्यालयात सदरचे प्रस्ताव सादर करावेत.
३) ग्रामीण भागातील (सर्व १३ तालुके) माध्यमिक शाळांनी गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती यांचेकडे प्रस्ताव सादर करावेत.

उपरोक्त प्रमाणे शाळांनी आपले स्वमान्यता प्रमाणपत्र मिळणेबाबतचे प्रस्ताव विहित प्रपत्रामध्ये भरुन तसेच सोबत आवश्यक ती सर्व कागदपत्रांच्या प्रती सदर प्रस्तावामध्ये जोडुन सदरचे प्रस्ताव उपरोक्त संबंधित कार्यालयामध्ये तात्काळ जमा करावेत.

स्वमान्यतेच्या फाईल्स सादर करताना R.T.E.Act २००९ नुसार सर्व निकषांची (१० निकष) पुर्तता अहवाल व वर्गनिहाय पटसंख्या अहवाल यावर सहा.प्रशासकीय अधिकारी / प्रशासन अधिकारी / गटशिक्षणाधिकारी यांच्याच स्वाक्षरीनेच सादर करावेत. **<u>केंद्रप्रमुख / शिक्षण विस्तार अधिकारी यांचे स्वाक्षरीचा अहवाल मान्य केला जाणार नाही.</u>**

प्रस्तावासोबत R.T.E.Act २००९ निकषाचा फॉर्म, शाळा मान्यता आदेश, प्रथम मान्यता आदेश, नैसर्गीक वर्ग वाढ मंजूरी आदेश, मागील दिलेल्या स्वमान्यता प्रमाणपत्राची प्रत (दि.१४/२०१३ ते दि. ३१/३/२०१६) व पटसंख्याबाबत अहवाल इ.कागदपत्रे सदर प्रस्तावामध्ये असल्याची खात्री करुन घ्यावी व तपासुन तपासणी फॉर्म भरुन कार्यक्षेत्राप्रमाणे सहा.प्रशासकीय अधिकारी / प्रशासन अधिकारी / गटशिक्षणाधिकारी यांच्या स्पष्ट शिफारशीसह **<u>सर्व एकत्रित प्रस्ताव या कार्यालयाकडे दि.३१/५/२०१६ पर्यंत सादर करावेत.</u>**

प्र. मुख्याध्यापिका
आयडियल पूर्ण प्रा. शाळा
५११, शनिवार पेठ, पुणे - ३०

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद पुणे. करिता

अध्यक्ष
आयडियल एज्युकेशन सोसायटी, पुणे ३०

<u>प्रत माहितीसाठी</u>
१) मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे-१

पुणे प्राथमिक शाळा

-२-

८. शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठ्यक्रमाचे पालन करीन.

९. शाळा, अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विहीत केल्याप्रमाणेच शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

१०. शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील. मागील तपासणीच्या वेळेस शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालील प्रमाणे होत्या:-

- शाळेच्या परिसराचे क्षेत्र :- २०५६.५ चौ मी
- एकूण बांधकामाचे क्षेत्र :- २०६६.९ चौ मी
- खेळाच्या मैदानाचे क्षेत्र :- १९.६५ चौ मी
- वर्ग खोल्यांची संख्या :- ९
- कार्यालय-नि-भांडार-नि-मुख्याध्यापकाची खोली :- १
- मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधन गृह आहेत काय ? :-

| | मुले | मुली |
|---|---|---|
| संडास | १ | १ |
| मुताऱ्या | २ | २ |

- पिण्याच्या पाण्याची सुविधा :- होय
- दुपारचे जेवण शिजवण्यासाठी स्वयंपाकघर :- आहे.
- अध्यापन अध्ययन साहित्य / खेळ व क्रिडाविषयक साधने /ग्रंथालय यांची उपलब्धता :- आहे.
- वाचन साहित्य विनासायास उपलब्ध :- आहे (पुस्तकसंख्या ८१८, नियतकालीके -२ , वर्तमानपत्रे-२)

११. मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया, शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र चालविता येणार नाहीत.

१२ शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रिडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.

१३. शाळा सोसायटी नोंदणी नियम १८६० (१८६० चा २१) किंवा मुंबई सार्वजनिक विवस्त अधिनियम १९५० अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.

१४. शाळा कोणत्याही व्यक्तीच्या ,गटाच्या किंवा व्यक्तीसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्याकरीता किंवा कोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.

१५. शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षित व प्रमाणित करुन घ्यावेत आणि नियमांनुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांकडे पाठविण्यात यावी.

१६. तुमच्या शाळेला मिळालेला मान्यता संकेतांक प्राथ/अनु/म/एस.एस.सी./पीएमसी./११४५/२०१६-१७ असा आहे. तसेच आपल्या शाळेचा U-DISE No २७२५१४०५२०१ हा आहे. या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यव्हार करताना कृपया तो नमुद करावा याची नोंद घ्यावी.

१७. मा.शिक्षण संचालक / जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पुर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दुर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकारण देईल अशा सुचनांचे पालन करावे.

१८. संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही असल्यास नुतनीकरण केल्याची सुनिश्चित करावी.

१९. जोडपत्र तीन नुसार इतर शर्ती या सोबत जोडल्या आहेत.

शिक्षणधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद.पुणे.